02 JAN 2026

जनप्रवास


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंची सुवर्ण कामगिरी

## विद्यापीठातील खेळाडूंना मिळताहेत अत्याधुनिक सुविधा : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडूंना शिष्यवृत्ती

**जनप्रवास : अहिल्या परकाळे, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागाचे नाव जागतिक पातळीवर सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. तसेच वसतिगृहात राहण्याची सोय झाल्याने बीए क्रीडा अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. यंदा अखिल भारतीय विद्यापीठ व खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेमध्ये विद्यापीठातील खेळाडूंनी १० सुवर्ण पदकांची कमाई केली आहे.



शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभाग दुर्लक्षित असल्याचे बोलले जात होते. परंतू कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वतः लक्ष घालून क्रीडा विभागाला उभारी देण्याचे काम केले. स्पर्धेला वेळेत पोहचण्यासाठी वेळप्रसंगी खेळाडूंना विद्यापीठाच्या खर्चातून विमानप्रवास घडवला. एवढेच नाही तर खेळाडूंना प्रवासात ड्रायफूटचा पुरवठा केला गेला. तसेच कुस्तीपंढरीतील पैलवानांना प्रोत्साहन देण्यासाठी बदलत्या काळानुरूप मॅटवरील कुस्तीसाठी कुस्ती संकुलही उभारले आहे. या संकुलात पैलवान दररोज कुस्तीचा सराव करीत असतात. यंदा कुस्तीसह सर्वच खेळांमध्ये विद्यापीठाच्या खेळाडूंनी उज्ज्वल यश संपादन केले आहे.

अखिल भारतीय विद्यापीठ क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया विद्यापीठ स्पर्धा, महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवातील स्पर्धांमध्ये यश संपादन केले आहे. मैदानी, आर्चरी, सायकलिंग, वेट लिफ्टींग, मॅटवरची कुस्ती, ज्युदो, कनोइंग कयाकिंग, नेमबाज, कबड्डी, बुध्दीबळ आदी स्पर्धांमध्ये खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य, कास्य पदकांची कमाई केली आहे. त्याचबरोबर खेलो इंडिया स्पर्धेत २५० टॉप विद्यापीठात सहभाग नोंदवत नवव्या स्थानापर्यंत शिवाजी विद्यापीठातील खेळाडूंनी मजल मारली. या कामगिरीबद्दल खेळाडूंचे कौतुक होत आहे. तर खेलो इंडिया स्पर्धेतील सर्वात वेगवान खेळाडू म्हणून ऋषीकेश देसाईला गौरवण्यात आले आहे. तसेच खेलो इंडिया मॅटवरील कुस्तीत दोन रौप्य पदकाची कमाई केली आहे. चंदीगड विद्यापीठात होणाऱ्या अखिल भारतीय मॅटवरील कुस्ती स्पर्धेसाठी पुरूष संघ रवाना झाला आहे. क्रीडा विभागाने घेतलेली भरारी विद्यापीठाच्या नॅक मानांकनाचे गुण वाढवणारी आहे.

● **४० सुवर्ण, रौप्य, कास्य पदकांची कामगिरी**

### शिवाजी विद्यापीठातून मिळवलेली पदके

| | | |
|---|---|---|
| ◆सुवर्ण | : | १० |
| ◆रौप्य | : | ११ |
| ◆कास्य | : | १९ |
| ◆एकूण | : | ४० पदके |

### राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकांची नेमणूक होणार

शिवाजी विद्यापीठातील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळतात. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराषट्रीय पातळीवरील प्रशिक्षकांची नेमणूक केली जाणार आहे. शाळा, महाविद्यालय व विद्यापीठाच्या खेळाडूंना मोफत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

### सर्वच खेळाची अद्यावत मैदाने उपलब्ध

पैलवान खाशाबा जाधवपासून ते स्वप्नील कुसाळेपर्यंत खेळाडू शिवाजी विद्यापीठाने तयार केले आहेत. शिवाजी विद्यापीठातील ८० टक्के खेळाडू ग्रामीण भागातील आहेत. त्यांच्यासाठी कुस्ती केंद्र, क्रिकेट मैदान, सिंथेटिक ट्रॅक, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बॉक्सींग, जिमनॅस्टिक आदी खेळांसाठीची अद्यावत मैदाने उपलब्ध केली आहेत. तसेच खेळाडू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देवून प्रोत्साहन दिले जाते. त्याचबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा संपूर्ण खर्च विद्यापीठ करते. विद्यापीठातील खेळाडूंना युनिफॉर्म दिला जातो. परंतू आता प्रभारी कुलगुरू व प्रभारी प्र-कुलगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक चांगल्या सुविधा दिल्या जात आहेत.

**- डॉ. शरद बनसोडे** (संचालक, क्रीडा, शिवाजी विद्यापीठ)

0 2 JAN 2026

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी नव्याने प्रबोधनाचा जागर व्हावा

## विद्यापीठातील कार्यशाळेत अभ्यासकांचा सूर; विविध पैलूंनी उलगडली चळवळीची गरज

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : 'प्रबोधन चळवळीची कास सोडल्याने समाजात सध्या अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. ते प्रश्न सोडविण्यासाठी पुन्हा नव्याने प्रबोधनाचा जागर व्हावा', असा सूर आज शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या कार्यशाळेत व्यक्त केला. त्यात तज्ज्ञ, अभ्यासकांनी विविध पैलूंनी प्रबोधन चळवळीची गरज मांडली.

विद्यापीठातील मानव्यशास्त्र सभागृहात पीएम उषा अंतर्गत 'प्रबोधन चळवळ आणि आजचा महाराष्ट्र' या विषयावर कार्यशाळा झाली. त्यातील पहिल्या सत्रात ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. श्रीराम पवार यांनी 'प्रबोधन चळवळ आणि आजचा महाराष्ट्र' या विषयाची मांडणी केली. महाराष्ट्रातील विविध प्रबोधन प्रवाहांचे सखोल विश्लेषण व आजच्या काळातील प्रस्तुतता याबद्दल सविस्तर विवेचन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रबोधन चळवळ, सामाजिक विकास, पर्यावरणीय समतोल, समकालीन आव्हानांची मांडणी केली.

दुसऱ्या सत्रामध्ये डॉ. भारत पाटणकर यांनी 'सत्यशोधक चळवळ आणि आजचा महाराष्ट्र' या विषयाच्या अनुषंगाने मांडणी केली. महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेत सत्यशोधक चळवळ ही एक समृद्ध व सर्वसमावेशक चळवळ असल्याचे मत त्यांनी मांडले. अध्यक्षस्थानावरून प्रा. डॉ. भारती पाटील यांनी स्त्री स्वातंत्र्याच्या चळवळी या प्रबोधन चळवळीच्या महत्त्वाच्या भाग राहिल्या आहेत. या चळवळीतून स्त्री स्वातंत्र्याचे विविध प्रवाह पुढे आले असल्याचे सांगितले.

तिसऱ्या सत्रामध्ये अभ्यासक डॉ. अरुण शिंदे यांनी महाराष्ट्रातील प्रबोधन परंपरेचा इतिहास समजून घ्यायचा असेल, तर सत्यशोधक पत्रकारिता समजून घेतल्याशिवाय ते शक्य नसल्याचे सांगितले. डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि प्रबोधन चळवळीचा इतिहास' याविषयी मार्गदर्शन केले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी धर्म सुधारणेसाठी बुद्धिप्रामाण्यवादाचा आग्रह धरला. तसेच महाराष्ट्राच्या प्रबोधन परंपरेमध्ये सकारात्मक योगदान दिल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. रवींद्र भणगे यांच्या 'महाराष्ट्रातील विकास आणि प्रादेशिक असमतोलाचे राजकारण' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. डॉ. नेहा वाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव उंदरे यांनी आभार मानले.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळेत 'महाराष्ट्रातील विकास आणि प्रादेशिक असमतोलाचे राजकारण' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. यावेळी शेजारी डॉ. सुखदेव उंदरे, रवींद्र भणगे, भारत पाटणकर, व्ही. एन. शिंदे, श्रीराम पवार, भारती पाटील, सुरेश शिपूरकर, अरुण शिंदे, नेहा वाडकर उपस्थित होत्या.

### चळवळींचा इतिहास महत्त्वाचा

**चौथ्या सत्रामध्ये डॉ. विलास पवार यांनी 'महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळ व त्याचे तत्त्वज्ञान' याचे सखोल विवेचन केले. महाराष्ट्राच्या विकासाच्यादृष्टीने प्रबोधन चळवळीचा इतिहास महत्त्वाचा असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्ष डॉ. भणगे यांनी प्रबोधन चळवळीची वाटचाल मांडली.**

# मुलुंड महाविद्यालयाने जिंकला राजर्षी करंडक

## 'स्वातंत्र्य सौभाग्य' एकांकिका पहिली : कॉमर्स कॉलेजची 'ग्वाही' दुसरी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १ : येथील संगीतसूर्य कला, क्रीडा, सांस्कृतिक फाऊंडेशनच्या राजर्षी करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेत मुंबईच्या मुलुंड वाणिज्य महाविद्यालयाने मोहोर उमटवली. त्यांनी सादर केलेल्या 'स्वातंत्र्य सौभाग्य' एकांकिकेला सहा वैयक्तिक बक्षिसांसह सांघिक पहिला क्रमांक मिळाला. येथील कॉमर्स कॉलेजच्या 'ग्वाही' एकांकिकेला दुसरा तर सातारा येथील थिएटर मुव्हमेंटच्या 'फुलपाखरू' एकांकिकेला तिसरा क्रमांक मिळाला. येथील शब्दजा संस्थेच्या 'नकाब आणि शहाजी लॉ कॉलेजच्या 'उन्नीस सौ नब्बे' एकांकिकेला उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आले.



**कोल्हापूर :** राजर्षी करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेतील उपविजेत्या कॉमर्स महाविद्यालयाच्या संघासह अभिनेता संजय मोहिते, युवराज घोरपडे, संयोगीता पाटील, सुभाष गुंदेशा, प्रसाद जमदग्नी, रोहन घोरपडे, सुनील घोरपडे, सुनील माने, वैशाली घोरपडे, किरणसिंह चव्हाण आदी.

दरम्यान, दिग्दर्शक युवराज घोरपडे, संयोगीता पाटील, सुभाष गुंदेशा, प्रसाद जमदग्नी, रोहन घोरपडे, सुनील घोरपडे आदींच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण झाले. परीक्षक म्हणून सुनील माने, वैशाली घोरपडे, किरणसिंह चव्हाण यांनी काम पाहिले. यावेळी अभिनेता संजय मोहिते यांना 'राजर्षी अभिमान' पुरस्काराने गौरविण्यात आले. नागठाणेच्या आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेजच्या 'सोयरिक' एकांकिकेला उत्कृष्ट सामाजिक आशय एकांकिका म्हणून गौरवण्यात आले.

**स्पर्धेचा सविस्तर अनुक्रमे निकाल असा...**

- **दिग्दर्शन** : अमित प्राटील (स्वातंत्र्य सौभाग्य), विशाल चव्हाण (ग्वाही)
- **पार्श्वसंगीत** : सार्थक खाडे (उन्नीस सौ नब्बे), प्रतीक भस्मे व साक्षी चरणकर (ग्वाही)
- **प्रकाशयोजना** : साई शिर्सेकर (स्वातंत्र्य सौभाग्य), पार्थ घोरपडे (नकाब)
- **नेपथ्य** : अद्वैत सात्ते (स्वातंत्र्य सौभाग्य), महेशकुमार चौगुले (ग्वाही)
- **रंगभूषा- वेशभूषा** : समृद्धी करंगुटकर (स्वातंत्र्य सौभाग्य), तनिष्का नागरे (उन्नीस सौ नब्बे)
- **उत्कृष्ट पुरुष अभिनय** : राजस बर्वे (पाऊस पाड्या), अभिषेक हिरेमठस्वामी (ग्वाही), हर्षवर्धन भोसले (सोयरिक)
- **उत्कृष्ट स्त्री अभिनय** : आर्या राणे (स्वातंत्र्य सौभाग्य), अक्षता बारटक्के (ग्वाही), मानसी बोळुरे (नकाब)
- **उत्कृष्ट लेखक** : तन्मय राऊत (अस्तित्व)
- **अभिनय प्रमाणपत्र** : बालकलाकार सक्षम कदम, रौनक सरनोबत, यश गुरुनीत, अजय बाक, हणमंत शिंदे, तन्मय राऊत, दीपरत्न पवार, दिव्येश इंदूलकर, जैद हसन, प्रवीण यादव, सृष्टी करंदीकर, संयोगीता चौधरी, सानिया देसाई, सई जाधव, श्रावणी मोरे, सई दरेकर, स्नेहा घडवई, श्रुती खिलारे, विपश्यना कामत.

जनसंपर्क कक्ष
02 JAN 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे आज उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग विभागाच्या वतीने आयोजित स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक आणि दिग्दर्शक आनंद पेंटर यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. २) सकाळी १०.३० वा होत आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन इमारतीत हा फेस्टिव्हल होईल. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव अध्यक्षस्थानी असतील. फेस्टिव्हल शुक्रवार आणि शनिवार असे दोन दिवस सायं. ५.३० वाजेपर्यंत असेल. अंतर्गत दोन दिवसांच्या पर्यावरणविषयक शॉर्टफिल्म आणि डॉक्युमेन्ट्रीच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धेसाठी २५ दिग्दर्शकांनी फिल्म सादर केल्या आहेत. हा महोत्सव सर्वांसाठी खुला असून, याचा लाभ घ्यावा, असे आवाहन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

02 JAN 2026


तरुण भारत

# योगसेई विद्यापीठाची ऋषिकेश ढवळे यांना पीएच. डी.

वार्ताहर

सरुड

येथील सुपूत्र व सध्या दक्षिण कोरिया येथे योनसेई विद्यापीठात शिक्षण घेत असलेले डॉ. ऋषिकेश पंडित ढवळे यांनी साहित्य विज्ञान व अभियांत्रिकी विभागात पर्यावरणीय पुनर्सुधारणेसाठी व ऊर्जा साठवण अनुप्रयोगांसाठी एरोजेल्स यावर जगातील ५० विद्यापीठांपैकी असलेल्या योनसेई विद्यापीठ, दक्षिण कोरिया येथून पीएच. डी. पदवी प्राप्त केली.




ऋषिकेश हा योनसेई विद्यापीठात शिक्षण घेत विविध तंत्रज्ञानावर संशोधन करत आहेत. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित वैज्ञानिक नियतकालिकांमध्ये प्रथम लेखक म्हणून ८ संशोधन लेख, सहलेखक म्हणून ४३ संशोधन लेख प्रकाशित केले आहेत. संशोधनपर लेखांची जागतिक स्तरावर दखल घेतली आहे. त्यांना पर्यवेक्षक प्रोफेसर ह्यूंग हो पार्क व त्यांची टीम, शिवाजी विद्यापीठ येथील स्कूल ऑफ नॅनोसायन्स व बायोटेक्नॉलॉजी आणि भौतिकशास्त्र विभाग व तसेच सध्या हिरोशिमा यूनिवर्सिटी जपान येथे कार्यरत असलेले असोसिएट प्रा. विनायक पारळे, सोलापूर यूनिवर्सिटीमधील असिस्टंट प्रा. मुकुंद माळी, वडील पंडित ढवळे, भाऊ प्रा. डॉ. राकेश ढवळे यांचे सहकार्य लाभले.

02 JAN 2026

लोकमत

# सिद्धांत पाटीलची विद्यापीठ हॉकी संघात निवड

कळंबा : मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे झालेल्या आंतरविभागीय हॉकी स्पर्धेतून डॉ. डी. वाय पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग साळोखेनगरचा



विद्यार्थी सिद्धांत शशिकांत पाटील याची विद्यापीठ संघात निवड झाली. भोपाळ येथे आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी ही निवड झाली. त्याला संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, ऋतुराज पाटील, तेजस पाटील, देवश्री पाटील, डॉ. अभिजित माने, प्राचार्य डॉ. सुरेश माने, प्रा. सुयोग पाटील यांचे प्रोत्साहन, प्रा. सचिन पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

02 JAN 2026
तरुण भारत

# स्पार्क फिल्म फेस्टिव्हलचे आज उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग विभागाच्या वतीने आयोजित स्पार्क फिल्म फेस्टिव्हलला आज प्रारंभ होत आहे. याचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक आणि दिग्दर्शक आनंद पेंटर यांच्या हस्ते सकाळी साडेदहा वाजता होणार आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन इमारतीत हे फेस्टिव्हल होणार आहे. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. फेस्टिव्हल आज व उद्या दोन दिवस सकाळी साडेदहा ते सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत असणार आहे. स्पार्क फिल्म फेस्टिव्हल अंतर्गत दोन दिवसांच्या पर्यावरणविषयक शॉर्टफिल्म आणि डॉक्युमेन्ट्रीच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाला किर्लोस्कर ऑईल इंजिनचे रमेश चव्हाण आणि हरिष सायवे, लक्ष्मी फाऊंडेशनचे विनायक देसाई व शरद आजगेकर यांची विशेष उपस्थित असेल. हा महोत्सव सर्वांसाठी खुला आहे, असे बी. ए. फिल्म मेकिंगचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी म्हटले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 JAN 2026
पुढारी

# जागतिक दर्जाचे स्वयं-अध्ययन साहित्य काळाची गरज : डॉ. वावरे

**कोल्हापूर** : भविष्यात शैक्षणिक क्षेत्रात केवळ ऑनलाईन शिक्षण नव्हे तर ओपन अँड डिस्टन्स मोड आणि ऑनलाईन मोड या दोन्ही पद्धतींसाठी दर्जेदार स्वयं-अध्ययन साहित्याची निर्मिती करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दूरशिक्षण विभागाचे सहसचिव डॉ. मधुकर वावरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे म्हणाले, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षणाला उज्ज्वल भवितव्य आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे या दोन्ही मोडचे महत्त्व वाढले असून, शिक्षणाचा विस्तार व सर्वसमावेशकता वाढविण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. प्रास्ताविक डॉ. कृष्णा पाटील यांनी केले. सुमन लोहार व प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले, डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.